महाराष्ट्र शासन
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
२८, क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे – ४११ ००१
फोन नं.: ०२० -२६३६ ०९४१, २६३६ २०७१

Email Id:
acc.trti-mah@nic.in

website:
trti.maharashtra.gov.in

जा.क्र.आसंप्रसं/२०२५/न्या गा.स./निर्लेखन /क्वेस्ट/ सुचना

दि.१४/०८/२०२५

## सुचना-१
## निर्लेखन पात्र जडसंग्रह वस्तुंची लिलाव/विक्री

आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे हे क्वेस्ट कार्यालय, अटलांटा इमारत, नरिमन पॉईंट, मुंबई ४०००२१ येथील जुने संगणक साहित्य निविदा पध्दत (बंद लिफाफा) अवलंबून विक्री करुन निर्लेखित करावयाची असून सदर निर्लेखनास सक्षम अधिकाऱ्यांची मान्यता मिळालेली आहे. ज्या निविदाधारकांना सदर खालील नमूद केलेले जुने संगणक साहित्य खरेदी करावयाचे आहे, त्यांनी संगणक साहित्य दि.१४/०८/२०२५ ते दि२५/०८/२०२५ या कालावधीत कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत दु.२:०० ते ४:०० या वेळेत क्वेस्ट कार्यालय, ४७, चौथा मजला, अटलांटा इमारत, हॉटेल स्टेटस जवळ, नरिमन पॉईंट, मुंबई ४०००२१ येथे पाहता येईल.

### निर्लेखन करावयाचे संगणक साहित्याचा तपशिल

| अ. क्र. | संगणक साहित्याचे नाव | नग संख्या |
|---|---|---|
| १ | Desktop Computer with monitor, key board, mouse | १० |
| २ | Laptop | ४ |
| ३ | Printer | ४ |
| ४ | TV | ३ |
| ५ | Mid Black office Wheel Chairs | ७ |

उपरोक्त जुने संगणक साहित्याची सविस्तर माहिती https://trti.maharashtra.gov.in/ या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. ज्यांना सदर जुने संगणक साहित्य खरेदी करावयाचे आहे, त्या निविदाधारकांना खालील मंजूर अटी व शर्ती प्रमाणे आपले दरपत्रक बंद लिफाफ्यामध्ये या कार्यालयाच्या Email: trti.mah@nic.in या ई-मेल आयडीवर दि.२५/०८/२०२५ (सोमवार) रोजी सांय.५:०० वाजेपर्यंत अथवा त्या पुर्वी या कार्यालयात समक्ष सादर करावीत. प्राप्त झालेली दरपत्रके दि.२६/०८/२०२५ रोजी उघडण्यात येतील.

**अटी व शर्ती**

१) निविदाधारकांनी बंद लिफाफावर **"जुने संगणक साहित्य व इतर तदनुषंगिक सामुग्री विक्री-२०२५"** असे ठळक अक्षरात नमूद करावे.

२) सदर जुने संगणक साहित्याचे दर एकत्र द्यावयाचे आहेत. दरपत्रकामध्ये जास्तीत जास्त दर आकारण्यात येणाऱ्या संस्थेस उपरोक्त सामुग्रीची विक्री करण्यात येईल. त्या निविदाधारकास कार्यालयीन आदेश निर्गमित करण्यात येईल. सदर निविदाधारकास आदेश प्राप्त होताच, त्याच दिवशी विक्रीची रक्कम रोख / धनाकर्षाने कार्यालयीन चलनाने जमा करुन पुढील दोन दिवसामध्ये जुने संगणक साहित्य कार्यालयातून बाहेर घेऊन जाणे बंधनकारक राहील.

३) दरपत्रका सोबत निविदाधारक / मालकाचे शॉपॲक्ट प्रमाणपत्र / उद्योग आधार सादर करणे आवश्यक राहील.

४) ज्या निविदाधारकास दर मंजूर करण्यात येईल त्या निविदाधारकास कोणताही हमाल वाहतूक अथवा सामान हताळणीचा खर्च तसेच महानगरपालिका वाहतूक कर या कार्यालयाकडून देय राहणार नाही. निकामी साहित्य कार्यालयातून बाहेर घेऊन जाताना कार्यालयीन कामकाज आणि अधिकारी / कर्मचारी यांना अडथळा होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

५) जुने संगणक साहित्य कार्यालयातून बाहेर घेऊन जात असताना कार्यालयीन वस्तूची तोडफोड झाल्यास त्याची नुकसान भरपाई रोखीच्या स्वरुपात त्याच ठिकाणी निविदाधारकाकडून वसुल करण्यात येईल. जुने संगणक साहित्य ज्या अवस्थेत आहे, त्याच अवस्थेत विकत घेणे निविदाधारकास बंधनकारक राहील. तसेच साहित्य बाहेर घेऊन जाताना भांडार शाखेतील कर्मचाऱ्याकडून वस्तूचे गेटपास उपलब्ध करुन घेणे अनिर्वाय राहिल.

आयुक्त,
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
पुणे.

CamScanner